त्यामुळे भारतातील बरीच मोठी मानवी शक्ति राष्ट्रीय उत्पन्नाच्या व देशाच्या सर्वांगीण विकासात योगदान देत नाही. ही एक फार मोठी समस्या व शोकांतिका म्हणावे लागेल. भारताला युवकांचा देश मानला जातो परंतु या देशातील युवकच बेकार व गरीब असतील तर देश पूर्णक्षमतेने विकसित होवू शकत नाही.

**उद्दिष्ट्ये:**

प्रस्तुत संशोधन लिखानाची काही महत्वाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. भारतातील दारिद्र्य व त्याची व्याप्ती समजावून घेणे

२. भारतात दारिद्र्य का वाढत आहे याचाही अभ्यास करणे

३. दारिद्र्य कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन लिखान करण्यासाठी दुय्यम साधनांचा आधार घेतला असून संबंधित विषयाला अनुसरून संदर्भ ग्रंथ, शासनाचे अहवाल, वर्तमान पत्रातील लेख, इंटरनेच्या माध्यमातून पूरक माहिती इ. चा आधार घेतलेला आहे.

**गृहितके:**

१. भारतात दारिद्र्य सातत्याने वाढत आहे.

२. सरकारच्या माध्यमातून देशातील दारिद्र्य कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे, परंतु त्यामुळे भारतातील दारिद्र्य फारशे कमी झालेले नाही.

**दारिद्रय म्हणजे काय?**

ज्या लोकांना अन्न, वस्त्र आणि निवारा या किमान गरजांची पूर्तता करता नाही अशा लोकांचा समावेश दारिद्र्य रेषेखाली केला जातो आणि ही प्रक्रिया दीर्घकाळापर्यंत टिकून रहाणे म्हणजे दारिद्र्य होय.

जागतिक बँक (२०२१) १.९०पीपीपी $ दारिद्र्य रेषेसाठी मानदंड समजला जावा. तर कमी मध्यम उत्पन्न रेषा ३.२० PPP $ दिवस , उच्च मध्यम उत्पन्न रेषा ५.५० PPP $ प्रती दिवस विचारात घेतली आहे. आशियाई विकास बँकेनुसार प्रति व्यक्ति प्रति दिवस १.५१ $पेक्षा कमी खर्च करणाऱ्यांना दरीदरयेरेषेखालील समजले पाहिजे.

तेंडुलकर तज्ञ गटाच्या (२००९) अभ्यासावरून असे दिसून येते की, ग्रामीण दारिद्र्य रेषा २६ रुपये प्रती व्यक्ति प्रतिदिन तर ३२ रुपये प्रती व्यक्ति प्रतिदिन कमी खर्च करणाऱ्या व्यक्तींना दारिद्र्य रेषेखाली मानले. वरील मापदंडानुसार सन २०११- मध्ये भारतातील २६.९ कोटी लोक दारिद्र्य रेषेखाली होते. त्यातील ७५ टक्के ग्रामीण भागात तर २५ टक्के लोक शहरी भागातील होते.

सी. रंगराजन समितीच्या (२०१४) अहवालानुसार ग्रामीण भागात दरमहा ९७२ रु. (३२ रु. दर दिवशी ) पेक्षा कमी खर्च करणाऱ्यांना गरीब म्हटले जाते. तर शहरी भागातील १४०७ रु. (४७ रु. दर दिवशी) पेक्षा कमी खर्च करणाऱ्यांना गरीब म्हणतात. रंगराजन समितीनुसार २०११-१२ मध्ये भारतात २९.५ टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली होते. याशिवाय १० पैकी तीन व्यक्ति गरीब आहेत. यांच्या मते २०११-१२ मध्ये भारतात ३६.५ कोटी गरीब होते.

वि. म. दांडेकर आणि नीलकंठ रथ यांनी २२५० कॅलरी मिळवून देणारा आहार किमान आवश्यक पातळीवरील आहार आवश्यक मानले आहे. म्हणजे २२५० कॅलरी मिळवून देणारा ज्यांना मिळत नाही अशा व्यक्तीला गरीब म्हणतात. त्यांच्या मते १९६८-६९ मध्ये एकूण लोकसंख्यापैकी ४० टक्के लोक आणि शहरी लोकसंख्यापैकी ५० टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली राहत होते.

राष्ट्रीय नमूना पाहणी मंडळाने आणि भारतीय सांख्यिकी संस्थेने विकसित केलेली सुधारित दारिद्र्य रेषेची संकल्पना वापरल्यास दारिद्र्य रेषेची कल्पना येते. त्यांच्या मते, १९८३ मध्ये ग्रामीण भागात ८९ रु. आणि शहरी भागात ११२.२ रु. ही दारिद्र्य रेषेची किमान मर्यादा निश्चित केली. या निकषाचा आधार घेवून जागतिक बँकेच्या मते १९८८ भारतात ३९.६ टक्के लोक दारिद्र्यात होते. तर अती दारिद्र्यात असणाऱ्या लोकांचे प्रमाण १९.२ टक्के होते. राष्ट्रीय नमूना पाहणी मंडळाच्या मते, भारतात २००४- ०५ मध्ये ग्रामीण भागात २९.३ टक्के आणि शहरी भागात २६ टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली होते. जागतिक बँकेनुसार भारतात सुमारे २२.४ कोटी लोक गरीब रेषेखाली आहेत. म्हणजे या लोकांना दररोज १२० रुपयांपेक्षा कमी खर्चात आपली उदरनिर्वाह चालवतात.

यापेक्षा शोकांतिक ही आहे की, संख्यात्मक दृष्टिकोणानुसार दारिद्र्याचे विश्लेषण केल्यास असे दिसून येते की, **जगात सर्वाधिक गरीब लोक भारतात राहतात. जगात सर्वात गरीब देश नायजेरिया आहे. या देशात जेवढे गरीब लोक राहतात त्यापेक्षा २.५ पट जास्त गरीब भारतात**

**राहतात. जगातील दर तीनपैकी एक गरीब भारतात राहतो.** भारतातील एकूण गरीब लोकसंख्येपैकी ६० टक्के लोक छत्तीसगड, बिहार, झारखंड, मध्यप्रदेश, ओडिसा, राजस्थान आणि उत्तर प्रदेश या राज्यात राहतात.

जागतिक बँकेच्या वर्गीकरणानुसार सन २०२०-२१ मध्ये भारत देश **निम्न मध्यम उत्पन्न** असलेल्या देशाच्या गटात येतो. कारण भारताचे दरडोई सकल राष्ट्रीय उत्पन्न GNI $११३६ आणि $ ४४६५ दरम्यान आहे. त्यामुळे भारताचे दरडोई उत्पन्न बांग्लादेश आणि श्रीलंका आणि पाकिस्तानपेक्षा कमी आहे.

**भारतातील राज्यनिहाय दारिद्र्य**

| अ. क्र. | **राज्य/केंद्रशासित प्रदेश** | **राज्यनिहाय लोकसंखेचे दारिद्र्य रेषेखालील प्रमाण % (२०१९-२१ )** | |
|---|---|---|---|
| | | **ग्रामीण** | **शहरी** |
| १ | गोवा | १.९० | ०.१२ |
| २ | केरळ | ०.७६ | ०.३२ |
| ३ | तामिळनाडू | 2.90 | १.४१ |
| ४ | आंध्र प्रदेश | ७.७१ | २.२० |
| ५ | पंजाब | ४.७४ | ४.७६ |
| ६ | हरियाणा | ८.४१ | ४.२६ |
| ७ | महाराष्ट्र | 11.49 | ३.०७ |
| ८ | कर्नाटक | 10.33 | ३.२२ |
| ९ | गुजरात | १७.१५ | ३.८१ |
| १० | राजस्थान | १८.६२ | ४.५४ |
| ११ | ओडिशा | १७.७२ | ५.४२ |
| १२ | संपूर्ण भारत | १९.२८ | ५.२७ |
| १३ | आसाम | २१.४१ | ६.८८ |
| १४ | मध्य प्रदेश | २५.३२ | ७.१० |
| १५ | उत्तर प्रदेश | २६.३५ | ११.५७ |
| १६ | बिहार | ३६.९५ | १६.६७ |

*वरील अकडेवारीवरून असे दिसून येते की, भारतात २०१९-२१ या दरम्यान १९.२८ टक्के गरीबी ग्रामीण भागात ५.२७ टक्के गरीबी शहरी भागात होती. आसाम,मध्यप्रदेश,उत्तरप्रदेशआणि बिहार या राज्यातील गरीबी देशातील सरासरी गरीबीपेक्षा जास्त आहे तर सर्वात कमी दारिद्रे गोवा आणि केरळ या राज्यात असल्याचे दिसून येते.*

*सामाजिक आणि धार्मिक वर्गांवर आधारित भारतातील गरिबी:*

**सच्चर समितीच्या अहवालावर आधारीत**

| सामाजिक आणि धार्मिक वर्ग | गरिबीत राहण्याची टक्केवारी |
|---|---|
| शहरी हिंदू | 20.4% |
| शहरी हिंदू जनरल | ८.३% |
| शहरी हिंदू ओबीसी | 25.1% |
| शहरी हिंदू SC/ST | 36.4% |
| शहरी मुस्लिम | 38.4% |
| शहरी इतर अल्पसंख्याक | १२.२% |
| ग्रामीण हिंदू | 22.6% |
| ग्रामीण हिंदू सामान्य | ९.०% |
| ग्रामीण हिंदू ओबीसी | 19.5% |
| ग्रामीण हिंदू SC/ST | 34.8% |
| ग्रामीण मुस्लिम | २६.९% |
| ग्रामीण इतर अल्पसंख्याक | 14.3% |

वरील तक्तामधील आकडेवारी सच्चर समितीने दिलेल्या अहवालातून घेतलेली आहे. या आकडेवारी धर्मानुसार तसेच ग्रामीण आणि शहरी भागानुसार, प्रवर्गानुसार दारिद्र्याचे विश्लेषण दिलेले आहे. वरील विश्लेषणावरून भारतात असलेल्या दारिद्र्याची कल्पना येते. वरील आकडेवारीचा अभ्यास केला तर असे दिसून येते की, शहरी मुस्लिम (38.4 %) आणि शहरी SC/ST प्रवर्गातील लोक सर्वाधिक गरीब आहेत तर सर्वात कमी गरीब असणारे शहरी हिंदू जनरल प्रवर्गातील लोक आहेत.

**भारतीय दारिद्र्य वाढीची कारणे:**

भारतात दारिद्र्य वाढीची समस्या पूर्वीपासूनच अस्तित्वात आहे. परंतु ही समस्या अलीकडील काळात लोकसंख्या वाढीमुळे जास्तच तीव्र झालेली आहे. भारतात दारिद्र्य वाढीची महत्वाची कारणे खालीलप्रमाणे सांगता येईल.

**१. शेतजमिनीवरील अतिरिक्त भार :**

अलीकडच्या काळात भारतीय शेतजमीनिवर अतिरिक्त भार पडत आहे. त्यामुळे शेतीचे लहान लहान भागात तुकडीकरण व विभाजन होत आहे. त्यामुळे शेतीत दर हेक्टरी उत्पादकता कमी झालेली आहे. शेतजमीनिवर उपजीविका करणारे आपली उपजीविका व्यवस्थित करू शकत नाहीत.

२ . शेतीच्या विकासाकडे शासनाचे दुर्लक्ष :

भारत कृषीप्रधान देश आहे. म्हणजे या देशात शेतीवर उपजीविका करणारे लोक जास्त आहेत. त्यामुळे शासनाचे हे कर्तव्य होते की, शेतीच्या विकासाकडे पूर्ण क्षमतेने लक्ष द्यावयास पाहिजे होते. जेणीकरून शेतीचा विकास झाला असता तर निश्चितच शेतीवर काम करणारे सर्व उच्च प्रतीचे जीवन जगले असते. परंतु दुर्दैवाने तसे झाले नाही त्यामुळे देशात लोकसंख्या वाढीबरोबर दारिद्र्य वाढत गेले.

३. सामाजिक विषमता:

भारतात आजही जातीयतेचे विष प्रत्येक भारतीयांच्या मनातून गेलेले नाही. प्रत्येक व्यक्ति दुसऱ्या जातीतील लोकांबद्दल द्वेषाची भावना ठेवत असतो. एक विशिष्ट जातीतील (उच्च मानले गेलेल्या) लोकांनाच नोकरीत संधी दिली जाते. त्यामुळे लोकसंख्येचा मोठा वर्ग संधीपासून आजही वंचित राहिला आहे.

४. आर्थिक विषमता :

भारतीय समाजव्यवस्थेमुळे आणि राजकीय आकार्यक्षमतेमुळे देशात तीव्र आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. सर्वात वरच्या १ % लोकांकडे देशातील एकूण संपत्तीचा ३१.५५ %, वरच्या १० % लोकांकडे ६३.६८ % संपत्तीचा हिस्सा तर तळाच्या ५० % लोकांकडे केवळ ६.१२ % संपत्तीचा हिस्सा आहे. ही तीव्रता प्रचंड आहे.

५. अकार्यक्षम निर्णय प्रक्रिया :

देशाच्या राजकारणात जे कोणी राज सत्तेवर विराजमान झालेले आहेत त्यांची निर्णय प्रक्रिया असमानतेने ग्रसित, पूर्णपणे राजकीय आणि अविद्वतापूर्ण असल्याचे दिसून येते. त्यामुळेच आजपर्यंत आपल्या देशातील दारिद्र्य कमी करण्यात या लोकांना अपयश आल्याचे दिसून येते.

६. नैसर्गिक आपत्ती:

भारतात नैसर्गिक आपत्ती जसे की, अतिवृष्टि, महापूर, भूकंप, दुष्काळ, महामारी इ. सातत्याने येत असल्यामुळे देशाची अर्थव्यवस्था फार मोठ्या प्रमाणात प्रभावित होत असते यामुळे देशात दारिद्र्य वाढत असते.

७. भाववाढ :

अलीकडच्या काळात चलनवाढ सातत्याने होत असल्यामुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ होत आहे. त्यामुळे त्यांची खरेदी शक्ति वाढल्यामुळे मागणी वाढली आहे. परंतु अशा मागणीची पूर्तता वेळेत न करता आल्यामुळे भाववाढ होत आहे. त्याचा वाईट परिणाम लोकांच्या राहनीमाणावर होत आहे. त्यांना आपली उपजीविका भागवणे कठीण होत आहे. यामुळे ते दारिद्र्य रेखाली जात आहेत.

याशिवाय बेकारी, व्यावसायीक शिक्षणाचा अभाव, जागतिकीकरण व खाजगीकरण, शासनाची उदाशिनता इ. मुळे देशात दारिद्र्य कमी न होता वाढत आहे.

**उपाययोजना :**

देशातील गरीबी कमी करण्यासाठी शासन खालीलप्रमाणे उपाययोजना करू शकते.

१. देशातील संपत्तीचे देशातील लोकांमध्ये समान वितरण करणे

२. देशातील युवकांना योग्य असे व्यावसायिक प्रशिक्षण देणे

३. देशातील साधन सामग्रीचा योग्य वापर करणे

४. सामाजिक समानता निर्माण करणे .

५. लोकसंख्या कमी करणे

६. श्रमप्रधान तंत्राचा वापर करणे

७. लघु व कुटीर उद्योगाचा विकास करणे

८. दीर्घकालीन रोजगाराच्या योजना सुरू करणे

९.शेतीच्या विकासासाठी प्रयत्न करणे.

**गृहीतकृत्याची पडताळणी**

प्रस्तुत संशोधन लिखाण करीत असताना असे दिसून आले की भारतात दारिद्राचे प्रमाण वाढत असून ते कमी करण्यासहसणाला फार्सहे यश मिळाले नाही हे संशोधकाने घेतलेले गृहीत खरे ठरताना दिसून येते.

**निष्कर्ष**

शासनास हे समजले पाहिजे की, गरिबांना धान्य मोफत वितरित केल्यामुळे तसेच कर्जमाफी केल्यामुळे किंवा रोजगार हमी योजना सारख्या योजना राबविल्यामुळे देशातील गरीबी संपुष्टात येणार नाही तर त्यासाठी दीर्घकालीन उपाय योजना केल्या पाहिजेत आणि त्या केवळ फोटो शोसाठी व प्रसिध्दीसाठी असता कामा नये. खरोखरच मनातून तन्मयतेने राष्ट्रीय भावनेतून देशाला व देशातील लोकांना एका उच्च पातळीवर घेवून जाण्याची आणि जगात आपल्या देशाचे नाव मानवी विकासाच्या निर्देशकांच्या श्रेणीत कमीत कमी पहिल्या १० मध्ये आणण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. भुकमरीच्या बाबतीत देश कसा वरच्या क्रमांकावर जाईल यासाठी प्रयत्न सत्ताधारी लोकांनी प्रयत्न केले पाहिजेत. देशातील लोकांमध्ये अंधश्रद्धा कमी करून विज्ञानवाद रुजवण्याचा प्रयत्न एक देशभक्त म्हणून केला पाहिजे. कोणतीही ईर्षा, भेदभाव, द्वेष मनात न बाळगता निष्पक्ष भावनेतून काम केल्यास देशाला एक नवी दिशा मिळू शकेल. अलिकडचे राजकारणी सत्ता केवळ उपभोगाची, पैसा कमवण्याचे साधन असल्याचे समजतात. आपण

इतरपेक्षा भिन्न व उच्च दर्जाचे आहोत आणि आपले जगच काहीसे वेगळे आहे असे वागत असतात. असे न करता आपण देश सेवेसाठी काम केले पाहिजे, लोकांनी आपणास त्यासाठीच निवडून दिले आहे अशी भावना ठेवून काम केल्यास आणि हे सर्व सत्तेत बसलेल्या नेते लोकांनी प्रयत्न केल्यास देशातील गरीबी तर कमी होईलच शिवाय देश निश्चितच विकशीत देशाच्या यादीत सर्वोच्च स्थानी विराजमान होईल. इतकी आपली क्षमता आहे.

**संदर्भग्रंथ सूची**


*१. "दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येची संख्या आणि टक्केवारी". रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया. 4 एप्रिल 2014 रोजी प्राप्त झाले.*

२ *भारत दुनिया का दूसरा सबसे असमान देश: वेल्थ रिपोर्ट" । हिंदुस्तान टाइम्स । 16 अगस्त 2017*

३. आशिया आणि पॅसिफिक आशियाई विकास बँक (एप्रिल 2012), ISBN 978-92-9092-666-5 , pp. 9-11 मध्ये अन्न सुरक्षा आणि गरीबी.

४. व्यावसायिक पर्यावरण -डॉ. एस. एम. भोसले,आर. जी. कोरबू, प्रोफ. जे. ए. यादव,फडके प्रकाशन

५.https://en-m-wikipediaorg.translate.goog/wiki/Poverty_in_India?_

6. भारतीय अर्थव्यवस्था (तृतीय संस्करण) डॉ. सुदामा सिंह , डॉ. राजीव कृष्ण सिंह

7. भारतातील गरीबी - नीलकंठ रथ आणि वि. म. दांडेकर

8. भारतीय अर्थव्यवस्था -प्रा. के. एम. भोसले,डॉ. एस. एम. भोसले आणि डॉ. पि. एच. कदम (फडके प्रकाशन)

9. भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल -प्रा. शरद शंकर जोशी (डायमंड प्रकाशन)